# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

प्रेसनोट

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक ०४/१०/२०२१

## सराईत घरफोडी गुन्हेगारास नवी मुंबई आयुक्तालयातील पनवेल गुन्हे शाखेकडून अटकरात्री घरफोडीच्या ३५ गुन्ह्याची उकल

---

नवी मुंबई आयुक्तालयातील गुन्हे शाखा कक्ष ०२ कडून सराईत गुन्हेगार अब्दुल सईदबकरीदी खान, वय ३५ वर्षे यास अटक करून त्याचेकडून रात्रीच्या वेळी दुकानाचे शटर उचकटून घरफोडी केलेले **नवी मुंबई आयुक्तालयातील ३१ व मुंबई आयुक्तालयातील ०४ असे ३५ रात्रीच्या घरफोडीचे गुन्हे उघडकीस** आणले आहेत. सदर आरोपी हा रात्रीच्या वेळी दुकानांचे शटर उचकटून घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार आहे. नमूद आरोपी कडून १३,२२,४१९/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे त्यापैकी ०२ एटी एम् व ०२ सहकारी बॅके मध्ये नमूद आरोपीने घरफोडी केली आहे.

नवी मुंबई आयुक्तालयातील तळोजा व खारघर या परिसरात रात्रीच्या वेळी दुकानांचे शटर तोडून घरफोडी केल्याचे गुन्हे वारंवार घडत होते. त्यामुळे ते थिलव्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होवून व्यापारी आसेसियशन मार्फत वेळोवेळी पोलीसांकडे तक्रारी नोंद केल्या जात होत्या. त्याअनुशंगाने मा. पोलीस आयुक्त श्री. बिपीनकुमार सिंह सो, नवी मुंबई, मा. सह पोलीस आयुक्त श्री. डॉ. जय जाधव सो, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. महेश घुर्ये सो, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. सुरेश मेंगडे सो, मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शाखा, श्री विनोद चव्हाण सो, यांनी आढावा घेवून घरफोडीच्या गुन्ह्यावर लक्ष केंदीत करून ते उघडकीस आणण्याबाबत गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना व सर्व पोलीस ठाण्यांना सूचना दिल्या होत्या.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे नवी मुंबई आयुक्तालयातील घरफोडीच्या गुन्हयांचा अभिलेख संकलित केला असता त्यामध्ये तळोजा व खारघर परिसरात काही ठराविक दिवसांच्या फरकाने एकाच रात्री अनेक दुकाणांचे शटर उचकटून दुकाने फोडल्याचे दिसून आले. सदर ठिकाणी प्रत्यक्ष जावून गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गिरीधर गोरे यांचे नेतृत्वाखाली सपोनि प्रविण फडतरे, पोउपनि. वैभवकुमार रौंगे, पोना अजिनाथ फुंदे यांनी तांत्रिक तपास, गुन्हे अभिलेख, गुन्हे करण्याची कार्यपद्धती व उपलब्ध सीसीटिव्हि फुटेज यांचा अभ्यास केला असता सदरचे गुन्हे हे ठराविक गुन्हेगारानेच केले असल्याचे दिसून आले. त्यानुसार वेगवेगळी पथके तयार करून कौशल्य पूर्ण तपास करीत असताणा सदरचे गुन्हे हे मुंबई, नवी मुंबई येथिल अभिलेखावरील घरफोडीचे २१ गुन्हे नोंद असलेल्या सराईत गुन्हेगाराने केले असल्याचे निष्पन्न झाले.

नमूद आरोपीतांचे मागावर असताना गुन्हे शाखा, कक्ष २, चे पोउनि वैभव रौंगे यांना गोपनीय बातमीदारा मार्फत तळोजा व खारघर परिसरात घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार हा तळोजा येथे पुन्हा घरफोडी करण्यासाठी येणार असल्याची माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीच्या अनुशंगाने गुन्हे शाखा कक्ष ०२ च्या अधिकारी व अंमलदार यांनी तळोजा या ठिकाणी सापळा लावला असता **यातील अटक आरोपी त्याचे ताब्यातील स्कूटर क्र MH 47 U 3866 डिक्कीमध्ये ठेवलेल्या घरफोडीच्या साहित्यासह मिळुन आला**. नमूद आरोपीतांकडे अतिशय कौशल्यपुर्ण तपास केला असता अटक आरोपी

हा मूळचा मानखुर्द येथिल राहणारा असून गेल्या ०६ महिण्यापासून त्याने शिळगाव, भोईर कंम्पाउन्ड येथे भाडयाने घर घेवून रात्रीच्यावेळी नवी मुंबई व मुंबई आयुक्तालयातील वेगवेगळया ठिकाणी घरफोडीचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले. नमुद अटक आरोपींकडून मुंबई व नवी मुंबई परीसरातील रात्रीच्यावेळी दुकानाचे शटर उचकटून घरफोडी केलेले एकुण ३५ रात्रीच्या घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणून नमुद आरोपीकडून एकुण१३,२२,४१९/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**<u>अटक आरोपीताचे नाव :-</u>**

**१) अब्दुल सईदबकरीदी खान, वय ३५ वर्षे, रा. ३० फुटरोड, १५ नंबर गल्ली, साईबाबा मंदिराचे बाजूला, मंडाला मानखुर्द, मुंबई**

**<u>पाहिजे आरेपी :-</u>** १) मंगल , पत्ता- मानखुर्द, मुंबई

**<u>अटक अरोपीतांनी दिलेल्या कबुली नुसार खालील नमूद ३५ रात्रौ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.</u>**

| अ. क्र. | पोलीस ठाणे | गुन्हारजि. क्रमांक |
|---|---|---|
| १ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २९/२०२१, भादवि कलम ३८०, ४५४, ४५७ |
| २ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. ३२/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७ |
| ३ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. १०२/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| ४ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. १९६/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| ५ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २०९/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, |
| ६ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २१७/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| ७ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २२०/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| ८ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २४७/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, |
| ९ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २७७/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५७ |
| १० | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २७८/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५७ |
| ११ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २८१/२०२१, भादवि कलम ३७९ |
| १२ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. २८२/२०२१, भादवि कलम ३७९ |
| १३ | तळोजा पोलीस ठाणे | गुरनं. ३६/२०२१, भादवि कलम ४५४,४५७,३८०,४२७,५११ |
| १४ | खारघर पोलीस ठाणे | गुरनं. २९८/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४२७ |
| १५ | खारघर पोलीस ठाणे | गुरनं. ३०३/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, |
| १६ | खारघर पोलीस ठाणे | गुरनं. ३२७/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| १७ | खारघर पोलीस ठाणे | गुरनं. ३२८/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| १८ | खारघर पोलीस ठाणे | गुरनं. ३२९/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| १९ | खारघर पोलीस ठाणे | गुरनं. ३३०/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| २० | खारघर पोलीस ठाणे | गुरनं. २८५/२०२१, भादवि कलम ३८०, ४५४ |
| २१ | नेरूळ पोलीस ठाणे | गुरनं. ३७१/२०२०, भादवि कलम ३८०, ४५४, |
| २२ | नेरूळ पोलीस ठाणे | गुरनं. २०१/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, |
| २३ | पनवेल शहर पोलीस ठाणे | गुरनं. ४८६/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| २४ | पनवेल शहर पोलीस ठाणे | गुरनं. ४८९/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| २५ | पनवेल शहर पोलीस ठाणे | गुरनं. ४९४/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, ४५४ |
| २६ | पनवेल शहर पोलीस ठाणे | गुरनं. ५१३/२०२१, भादवि कलम ३८०, ४५७, |

| | | |
|---|---|---|
| २७ | पनवेल तालुका पोलीस ठाणे | गुरनं. १३१/२०२१, भादवि कलम ३८०, ४५४, ४५७ |
| २८ | पनवेल तालुका पोलीस ठाणे | गुरनं. १३२/२०२१, भादवि कलम ३८०, ५११,४२७ |
| २९ | रबाळे पोलीस ठाणे | गुरनं. २४४/२०२१, भादवि कलम ३८०, ४५४, ४५७, ४२७ |
| ३० | कोपरखैरणे पोलीस ठाणे | गुरनं. २२९/२०२१, भादवि कलम ४५७,३८०, ५११ |
| ३१ | सीबीडी तालुका पोलीस ठाणे | गुरनं. ६२/२०२१, भादवि कलम ४५४,४५७,३८०, ५११ |
| ३२ | सायन पोलीस ठाणे, मुंबई | गुरनं. ४२५/२१, भादवि कलम ४५७,४५४,३८० |
| ३३ | मांटुगा पोलीस ठाणे, मुंबई | गुरनं. २९३/२१, भादवि कलम ४५७,४५४,३८० |
| ३४ | मांटुगा पोलीस ठाणे, मुंबई | गुरनं. २९४/२१, भादवि कलम ४५७,४५४,३८० |
| ३५ | गोवंडी पोलीस ठाणे, मुंबई | गुरनं. ४१०/२१, भादवि कलम ४५७,४५४,३८० |

सदरच्या गुन्हयाच्या तपासादरम्यान गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गिरीधर गोरे यांचे नेतृत्वाखाली सपोनि प्रविण फडतरे, सपोनि संदिप गायकवाड, पोउनि वैभव रौंगे, पोउनि मानसिंग पाटील, पोना/४४१३ अजिनाथ फुंदे, सफौ सुदाम पाटील, पोहवा १७३२ अनिल पाटील, पोहवा १०३४ ज्ञानेश्वर वाघ, पोहवा/१३३९ प्रशांत काटकर, पोहवा/१३४३ मधुकर गडगे, पोहवा/४२० सचिन पवार, पोहवा/१९३ रणजित पाटील, पोहवा/४४ तुकाराम सुर्यवंशी, पोहवा/१९३० राजेश बैकर, पोहवा/२७०० सुनिल कुदळे, पोना/१७३८ दिपक डोंगरे, पोना २००५ सचिन म्हात्रे, पोना २०२२ रूपेश पाटील, पोना/२०८२ इंद्रजित कानु, पोना/२२५६ राहुल पवार, पोना/२३३४ प्रफुल्ल मोरे, पोशि/१२५९३ संजय पाटील, पोशि/३५७७ प्रविण भोपी, पोशि ४३१७ विक्रंत माळी, पोहवा १५५० जगदिश तांडेल, पोशि ३५४१ नंदकुमार ढगे, पोशि ३६२५ अभय मेऱ्या यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

---000---

# <u>प्रेससाठी मुद्दे</u>

- नवी मुंबई, मुंबई परिसरातील रात्री दुकाणांचे शटर उचकटुन घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखेकडून अटक करून नवी मुंबई, मुंबईतील रात्री घरफोडीच्या ३५ गुन्हयांची उकल.
- नवी मुंबई आयुक्तालयातील तळोजा व खारघर या परिसरात रात्रीच्या वेळी दुकानांचे शटर तोडून घरफोडीकेल्याचे गुन्हे वारंवार घडत होते. त्यामुळे तेथिल व्यापाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होवून व्यापारी आसेसियशन मार्फत वेळोवेळी पोलीसांकडे तक्रारी नोंद केल्या जात होत्या.
- त्याअनुशंगाने मा. पोलीस आयुक्त श्री. बिपीन कुमार सिंह सो, नवी मुंबई, मा. सह पोलीस आयुक्त श्री. डॉ. जय जाधव सो, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. महेश घुर्ये सो, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. सुरेश मेंगडे सो, मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शाखा, श्री विनोद चव्हाण सो, यांनी आढावा घेवून घरफोडीच्या गुन्ह्यावर लक्ष केंदीत करून ते उघडकीस आणण्याबाबत गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना व सर्व पोलीस ठाण्यांना सूचना दिल्या होत्या.
- आयुक्तालयातील घरफोडीच्या गुन्हयांचा अभिलेख संकलित केला असता त्यामध्ये तळोजा व खारघर परिसरात काही ठराविक दिवसांच्या फरकाने एकाच रात्री अनेक दुकाणांचे शटर उचकटून दुकाने फोडल्याचे दिसून आले.
- तांत्रिक तपास, गुन्हे अभिलेख, गुन्हे करण्याची कार्यपद्धती व उपलब्ध सीसीटिव्हि फुटेज यांचा अभ्यास केला असता सदरचे गुन्हे हे ठराविक गुन्हेगारानेच केले असल्याचे दिसून आले. त्यानुसार वेगवेगळी पथके तयार केली.
- गुन्हे शाखा कक्ष ०२ च्या अधिकारी व अंमलदार यांनी तळोजा या ठिकाणी सापळा लावला असता यातील अटक आरोपी त्याचे ताब्यातील स्कूटर क्र MH 47 U 3866 च्या डिक्कीमध्ये ठेवलेल्या घरफोडीच्या साहित्यासह मिळुन आला.

  मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे व मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शना प्रमाणे प्राप्त गोपनिय माहितीवरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गिरीधर गोरे योचे नेतृत्वाखाली नमुद अटक आरोपींकडून मुंबई व नवी मुंबई परीसरातील रात्रीच्या वेळी दुकानाचे शटर उचकटून घरफोडी केलेले एकुण ३५ रात्रीच्या घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्यापैकी ०२ एटीएम् व ०२ सहकारी बॅके मध्ये नमूद आरोपीने घरफोडी केली आहे.
- उघड गुन्हयामध्ये नवी मुंबई आयुक्तालयातील ३१ व मुंबई आयुक्तालयातील ०४ असे ३५ रात्रीच्या घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.
- नमुद आरोपी कडून एकुण १३,२२,४१९/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

  गुन्हयातील पाहिजे आरोपी मंगल , पत्ता - मानखुर्द, मुंबई याचा शोध घेवून त्यास अटक करण्याचा सर्वोत्परी प्रयत्न चालू आहेत.
- नमूद अटक आरोपीताकडून नवी मुंबई परिसरातील आणखी काही रात्री घरफोडीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.
- सदरच्या गुन्हयाच्या तपासादरम्यान गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. गिरीधर गोरे यांचे नेतृत्वाखाली सपोनि प्रविण फडतरे, सपोनि संदिप गायकवाड, पोउनि वैभव रौंगे, पोउनि मानसिंग पाटील, सफौ सुदाम पाटील, पोहवा १७३२ अनिल पाटील, पोहवा १०३४ ज्ञानेश्वर वाघ, पोहवा/१३३९ प्रशांत काटकर, पोहवा/१३४३ मधुकर गडगे, पोहवा/४२० सचिन पवार, पोहवा/१९३ रणजित पाटील, पोहवा/४४ तुकाराम सुर्यवंशी, पोहवा/१९३० राजेश बैकर, पोहवा/२७०० सुनिल कुदळे, पोना/१७३८ दिपक डोंगरे, पोना २००५ सचिन म्हात्रे, पोना २०२२ रूपेश पाटील, पोना/२०८२ इंद्रजित कानु, पोना/२२५६ राहुल पवार, पोना/२३३४ प्रफुल्ल मोरे, पोशि/१२५९३ संजय पाटील, पोशि/३५७७ प्रविण भोपी, पोशि ४३१७ विक्रांत माळी, पोहवा १५५० जगदिश तांडेल, पोशि ३५४१ नंदकुमार ढगे, पोशि ३६२५ अभय मेरे यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

----०००----